सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२ web:-www.doa.maharashtra.gov.in

**क्रमांक - डिओओ/२०२१-२२/चार/५१** **दिनांक :-** २१ फेब्रुवारी, २०२२.

वाचावे :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.११/एसडी-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०२२.

## परिपत्रक

कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव व त्यामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे सन २०२०-२१ या वर्षी शासकीय रेखाकला परीक्षांचे आयोजन होऊ शकलेले नव्हते.

सन २०२१-२२ या वर्षी इयत्ता १० वी च्या परीक्षेला बसणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना सन २०२०-२१ यावर्षी एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेला बसता आले नाही, अशा विद्यार्थ्यांनी सन २०२१-२२ मध्ये केवळ इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या श्रेणीच्या आधारे, त्यांना सन २०२१-२२ यावर्षापुरते सवलतीचे गुण देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदरचा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०२२११५१४४४२७२१ असा आहे. सदर शासन निर्णय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा.

(राजीव मिश्रा)
कला संचालक,
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
सर्व शासकीय रेखाकला परीक्षा केंद्र प्रमुख/मुख्याध्यापक /प्राचार्य/ संबंधित विद्यार्थी व पालक यांचेकरिता.
प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) निवड नस्ती.

सन २०२१-२२ या वर्षी इयत्ता १० वीच्या परीक्षेला प्रविष्ट झालेल्या व चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.११/एसडी- २**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई - ३२
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०२२

**संदर्भ** : १. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण- २०१६/ प्र.क्र.२०२/ एसडी-२, दिनांक २४ नोव्हेंबर २०१७.
२. शासन शुध्दीपत्र, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण- २०१६/ प्र.क्र.२०२/ एसडी-२, दिनांक २० डिसेंबर २०१७.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय व संदर्भ क्र. २ येथील शासन शुध्दीपत्रकान्वये शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयानातील परि.क्र.२.३.२ मध्ये "विद्यार्थी एलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण असल्याशिवाय इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे गुण मिळणार नाही." अशी तरतूद आहे.

तथापि, कोवीड-१९ चा प्रादुर्भाव व त्यामुळे उद्भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे सन २०२०-२१ या वर्षी शासकीय रेखाकला परीक्षांचे आयोजन होऊ शकलेले नव्हते. सन २०२०-२१ मध्ये शासकीय रेखाकला परीक्षा आयोजित न झाल्यामुळे विद्यार्थी एलिमेंटरी परीक्षा देऊ शकलेले नाहीत. त्यांना परीक्षा देण्याची संधी मिळू शकलेली नाही. अशा विद्यार्थ्यांनी केवळ इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या श्रेणीच्या आधारे, त्यांना सन २०२१-२२ या वर्षापुरते सवलतीचे गुण देण्यास मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

कोवीड-१९ मुळे उद्भवलेल्या असामान्य परीस्थितीमुळे, सन २०२१-२२ या वर्षी इयत्ता १० वी च्या परीक्षेला बसणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना सन २०२०-२१ या वर्षी एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेला बसता आले नाही, अशा विद्यार्थ्यांनी सन २०२१-२२ मध्ये केवळ इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या श्रेणीच्या आधारे, त्यांना सन २०२१-२२ या वर्षापुरते सवलतीचे गुण देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निर्णय फक्त सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापुरता लागू राहील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२२०२२११५१४४२७२१ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Imtiyaz Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SCHOOL EDUCATION & SPORT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, serialNumber=77a529748c5e7c1ba7a66e81c654ba3c492fda5b29e076241db1ba213ddedf4e, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2022.02.21 15:23:30 +05'30'

**(इ.मु.काझी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
७) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
८) कला संचालक, कला संचालनालय, मुंबई
९) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१०) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
११) सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
१२) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१३) सर्व शिक्षण निरीक्षक, मुंबई (पूर्व, पश्चिम, उत्तर)